969

**संदर्भ - 1.मा. उच्च न्यायालय,मुंबई यांनी पीआयएल क्रमांक 120/2010 मध्ये दिलेला निर्णय.**
**2.कार्यासन अधिकारी,महसूल व वन विभाग (म-1) मंत्रालय,मुंबई यांचे पत्र क्र.मुद्रांक-2012/प्र.क्र.25/ म-1 दि.19/3/2013.**
**3.या कार्यालयाचे परीपत्रक क्रमांक का.4/प्र.क्र.247/12/177 दि. 25/3/2013.**

---

जा.क्र.का.4/प्रक्र 737 /14/259
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,
दिनांक 4/2/2015

**परीपत्रक :-**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 चे कलम 36 अ मध्ये विक्री, अदलाबदल, बक्षीस, गहाणखत, भाडेपटटा किंवा "अन्यप्रकारे " द्वारे होत असलेले व्यवहार प्रतिबंधीत केले आहे. मा. उच्च न्यायालय,मुंबई यांनी आदीवासी सर्वागीण विकास समिती विरुध्द महाराष्ट्र शासन पीआयएल क्रमांक 120/2010 मध्ये दिनांक 12/7/2013 रोजी दिलेल्या निर्णयामध्ये "अन्यप्रकारे" या शब्दप्रयोगामध्ये आदीवासी व विना आदीसावी मधील विकसन करार व मुखत्यांरनामा या दस्तांच्या माध्यमाने होत असलेले व्यवहार देखील प्रतिबंधीत होत असल्याचा निर्णय दिलेला आहे. सदर निर्णयाचे अनुषंगाने, सदंर्भ 2 चे शासनाचे निर्देशान्वये, सदंर्भ क्र.3 नुसार या कार्यालयाने परीपत्रक निर्गमित केलेले आहे.

मा. न्यायालयाने, कलम 36 अ अधिक स्पष्ट करतांना, अन्यप्रकारे / ' Or otherwise ' शब्दप्रयोगामध्ये Widerness (व्यापकता) व Comprehensiveness (सर्वसमावेशकता) अंतर्भूत आहे. सबब आदीवासी व्यक्तींची वहीवाट विनाआदीवासी व्यक्तीच्या लाभात हस्तांतरीत करण्याचे योजिले असलेले सर्व करार ( All Agreements ) देखील अंतर्भूत होत असल्याने, असे करार मग त्या कोणत्याही नामाभिधानचे अथवा स्वरुपाचे असो, त्यात नमूद व्यवहार हे प्रतिबंधित स्वरुपातील आहेत, असे स्पष्ट केलेले आहे.

वरील अर्थ स्पष्ट असतांना देखील नाशिक व नागपूर विभागात विनापरवानगीने कराराचे दस्त नोंदण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. याच वेळीस आळा बसावा या हेतूने, सर्व दुय्यम निबंधक यांना पुनरपि सूचित करण्यात येते की, वरील स्वरुपाच्या व्यवहाराचे पूर्तीकरीता करण्यात आलेले कोणतेही करार मग ते कोणत्याही नामाभिधनाचा असो, ते प्रतिबंधीक स्वरुपाचे असल्याने असे दस्त राज्य शासन व जिल्हाधिकारी यांचे पूर्वमंजूरीशिवाय नोंदणीस स्वीकारण्यात येऊ नयेत.

तसेच MLRC चे कलम 36(2) नुसार, अनुसूचित / आदीवासी जमातींच्या व्यक्तींमधील आपसात होणा-या वहीवाटीचे हस्तांतरण देखील प्रतिबंधित आहे. यास्तव, सर्व दुय्यम निबंधक यांना सूचित करण्यात येते की, अशा व्यवहारांच्या पूर्ततेकरीता केलेल्या कोणत्याही प्रकारचे दस्त नोंदवितांना जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी दस्तास असेल तरच अशा दस्तऐवजांची नोंदणी करण्यात यावी.

**का.प्र.मा.नो.म.नि.यांची सहीचे असे.**

नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय)
महाराष्ट्र राज्य,पुणे.
o/c

प्रति,

1.सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक

2.सर्व सह जिल्हा निबंधक (सबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेमार्फत )

3.सर्व दुय्यम निबंधक (सबंधित सह जिल्हा निबंधक यांचेमार्फत )

4.सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय,पुणे

प्रत- कार्यासन अधिकारी,महसूल व वन विभाग (म-1) मंत्रालय,मुंबई यांना माहीतीकरीता.